
# चला मोजूया आणि लिहूया
# उन्नत महाराष्ट्र अभियान - आयआयटी मुंबई

## कृती - १ (६ वी आणि ७ वी)

**नाव -** नकाशात गावातील रस्ते दाखवणे.

**उद्दिष्टे -** नकाशाद्वारे आपल्या गावातील रस्त्यांची स्थिती समजून घेणे.

**साधने - (नकाशा)**




छायाचित्र : गावाचा नकाशा

**अध्ययन निष्पत्ती** - **(06.73G.22) पृथ्वीगोल व नकाशा यांचा वापर करतो.**

***शिक्षकांना सूचना - काळ्या अक्षरात**

*** फळ्यावर लिहिण्याची वाक्ये - हिरव्या रंगात**

*** विद्यार्थ्यांशी बोलण्याची वाक्ये - निळ्या रंगात**

**पायऱ्या -**

प्रश्न आणि चर्चेतून सुरवात:

**पूर्वतयारी -** स्थानिक भौगोलिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी प्रशिक्षकाने गावाबद्दल पुरेसे जाणून घ्यावे. गावात थोडा फेरफटका मारणे. स्थानिक लोकांशी बोलणे याद्वारे पार्श्वभूमी जाणून घेता येईल. त्यातून उप्रकम घेताना प्रशिक्षकाला वेगवेगळी स्थानिक उदाहरणे देता येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना समजायला सोप्पे जाईल.
(आपल्या गावातले एखादे ठिकाण प्रशिक्षकाणे सांगणे आहे ते त्या ठिकाणच्या आजूबाजूच्या महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा करणे - पिण्याच्या पाण्याची टाकी/ स्मशानभूमी कुठे आहे त्यांच्या आजूबाजूला कोणत्या वाड्या आहेत विशिष्ट वाडीत असलेले विशिष्ट ठिकाण सांगणे व फळ्यावर लिहिणे.)

(नकाशा बद्दल चर्चा करा व २-३ प्रवासांवर चर्चा करा.) **नकाशे पाहिले आहेत का? मुलांना मुंबईला जातानाचे वर्णन करणे. गावातून लांजा तालुक्यात जाताना तुम्हाला कोणती गावे लागतात हे विचारणे. वाडीतून शाळेत येताना कोणती ठिकाणे दिसतात ते विचारणे.**
**(विचारलेल्या आधी मुंबई मग लांजा व मग आपलं गाव असे टप्या-टप्याने गावाच्या नकाशा पर्यंत येणे.**
१) **गावात कोणते भाग (कोणत्या वाड्या) आहेत ह्यावर चर्चा करणे.**
२) **तुम्ही शाळेत कसे येतात हे विचारून त्यांना रस्ते ह्या विषयाकडे घेवून जाणे.**
**३) तुम्ही शाळेत येताना कोणकोणत्या गोष्टींच निरीक्षण करत येता हे विचारणे व फळ्यावर लिहिणे.**

| **मुलाचे नाव** | **वाडीचे नाव** | **शाळेत यायला किती वेळ लागतो** |
|---|---|---|
| प्रिया | हरमलेवाडी | 15 मिनिटे |
| | | |

४) **तुम्ही भूगोलाच्या पुस्तकात आतापर्यंत कोणते नकाशे पाहिले .**
**(सांगितलेले नकाशे फळ्यावर लिहा.)**
**(आपल्या गावाचा नकाशा तुम्ही पाहिला आहे का? तसेच गावातील रस्त्यांचा नकाशा तुम्हाला पाहायला आवडेल का?)**
५) **त्यानंतर मुलांना आपल्याकडचा गावातील रस्त्यांचा नकाशा दाखवणे.**
**(नकाशावरील बाबी मुलांना सांगा.)**
६) **मुलांना आपल्याकडील नकाशा पाहण्यासाठी देणे.**
**(त्यांना नकाशात एक लांबची वाडी/ठिकाण व आपली वाडी व शाळा ह्या तीन गोष्टींकडे जाण्यासाठी रस्ता आहे का ते बघायला सांगा.)**
**(मूलं निरीक्षण करतायत का हे फिरून पाहा.)**
७) **त्या नकाशात मुलांनी बघायला सांगितलेल्या गोष्टी विचारून मुलांकडून आलेली उत्तरे फळ्यावर लिहिणे.**
**(मुलांना रस्त्याने येताना काय दिसते हे मुलांना जागेवर उभे करून विचारणे व फळ्यावर लिहिणे.)**

| मुलाचे नाव | वाडीचे नाव | शाळेत यायला किती वेळ लागतो | शाळेत येताना वाटेत काय दिसते? |
|---|---|---|---|
| प्रिया | हरमलेवाडी | 15 मिनिटे | नवलादेवी मंदिर, घरे, गुरववाडी |

८) **मुलांचे पाहून झाल्यावर तो नकाशा फळ्यावर लावणे व मुलांना ते कोणत्या वाडीतून येतात (पुढे येऊन मूलं शाळेत कसे येतात ते नकाशा बघून दाखवायला सांगणे.)**

**(तो पर्यंत इतर विद्यार्थ्यांना त्यांच्या वाडीच्या आजूबाजूला नकाशात काय दिसते ते पाहून वहीवर लिहायला सांगा.)**

**९) त्यानंतर मुलांना शाळेत येताना लागणारा वेळ / अंतर विचारणे.**

१०) **(रस्त्याचे प्रकार मुलांना विशेषणे वापरून सांगा.)**

***चांगला रस्ता - रुंद, गुळगुळीत व वाहनांनी (दुचाकी, चारचाकी) प्रवास करता येणारे,**

***खराब रस्ता - मातीचा, खडबडीत व अरुंद )**

**११) आता मुलांना त्यांच्या घरापासून येणारा रस्ता कोणत्या कसा आहे हे विचारणे.**

**(मुलांकडून आलेली उत्तरे फळ्यावर लिहा.)**

| मुलाचे नाव | वाडीचे नाव | शाळेत यायला किती वेळ लागतो | शाळेत येताना वाटेत काय दिसत ? | या व्यतिरिक्त तुम्ही अजून गावात कुठे फिरता? | फिरण्याचे कारण | त्या प्रवासात तुम्हाला काय दिसते? | अंतर/ वेळ | गावातील लांबची वाडी कोणती | तुम्ही शाळेत येता त्या रस्त्याचे नकाशातील नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रिया | हरमले वाडी | 15 मिनिटे | नवलादेवी मंदिर, घरे, गुरववाडी | भातडेवाडी | मित्राकडे | दुकान, चौक | 10 मिनिटे | कुसुमळवाडी | VR91 |
| | | | | | | | | | |

१२) **(प्रत्येक वाड्यांचे नाव फळ्यावर लिहा.) त्या वाडीतील १ मुलाला उभे करून त्या वाडीतील रस्ता मुलांच्या मते कसा आहे हे विचारणे.**

**१३) वाडीच्या नावासमोर रस्ता चांगला आहे का खराब मुलांना येऊन तक्त्यात लिहायला सांगणे.**

| क्र. | वाडीचे नाव | रस्ता कसा आहे ? (चांगला / खराब) |
|---|---|---|
| | | |

**कालावधी -** २५ मिनिटे

**साहित्य -** गावाचा नकाशा, रंगीत स्केचपेन्स

**सूचना** - ह्या नकाशाचा उपयोग गावातील शेतीचा भाग, सार्वजनिक मालमत्ताचा, आपल घर दाखवण्यासाठी उपयोग करता येईल.

**प्रश्न -**

१) दवाखान्यात जाणार रस्ता कसा आहे? (कच्चा, खड्डे, डांबरी)

२) तुम्ही ज्या रस्त्याने घरी जाता त्या रस्त्याने जाताना तुम्हाला कोणत्या वाड्या लागतात?

३) तुमच्या परिसरातील तुमच्या मते कोणता रस्ता खराब आहे व त्या रस्त्याचे महत्त्व काय आहे ते लिहा.

**(गृहपाठ)** - नकाशाचे निरीक्षण करा आणि एक प्रवासाचे वर्णन ५ वाक्यात लिहा.